SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103, 2609101

Estd.1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF – 28th Rank

संदर्भ क्र.शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/ 1521 दि 04/04/2018

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

विषय – उन्हाळी द्वितीय सत्रातील मार्च/एप्रिल,2018 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीबाबत.....

संदर्भ– दि. 03 नोव्हेंबर,2017 आणि दि. 09 मार्च 2018 रोजी मा. राज्यपाल कार्यालयाकडून आयोजित व्हिडीओ कॉन्फरंन्स बैठक

महोदय/महोदया,

आपणास विदीत आहेच की, शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी द्वितीय सत्रातील मार्च/एप्रिल ,2018 च्या परीक्षा दि.22 मार्च,2018 पासून सुरू झालेल्या आहेत. उत्तर पत्रिका तपासणी करिता जिल्हानिहाय मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत. सदर केंद्रांमध्ये उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज सूरू असून परीक्षांचे निकाल विद्यापीठ सार्वजनिक अधिनियम 2016 कलम (3)(4) नुसार 30 दिवसांमध्ये जाहीर होणे बंधनकारक असल्याने आपल्या महाविद्यालयातील सर्व पात्र शिक्षकांच्या सेवा उत्तरपत्रिका तपासणीकरिता उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. तसेच आपल्या महाविद्यालयातील प्रविष्ठ विद्यार्थी संख्येएवढया किमान उत्तरपत्रिकांची तपासणी प्रत्येक महाविद्यालयातील शिक्षकांनी केलीच पाहिजे असे आपणास सक्त सूचित करण्यात येत आहे. कॅप सेंटरवर नेमून दिलेले शिक्षक उपलब्ध झाले नाहीत अथवा वारंवार कळवून देखील हजर राहिले नाही अशा सर्व शिक्षकांची नावे सविस्तर माहितीस्तव पुढील कार्यवाहीकरीता परीक्षा विभागास प्राचार्य/ संबंधीत कॅप डायरेक्टर यांनी तातडीने पाठवून देणेची आहेत.

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या प्रलंबित निकालाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये परीक्षांच्या निकालाबाबत संभ्रमावस्था निर्माण झालेली होती, त्यास अनुसरून मा. राज्यपाल कार्यालयाकडून आयोजित व्हिडीओ कॉन्फरंन्स बैठकीद्वारे सुचित केलेल्या सुचनेनुसार सर्व संबंधीत शिक्षकांना उत्तरपत्रिका तपासणीसाठी पाठवून परीक्षांचे निकाल 30 दिवसांत जाहीर करणे करीता सर्वानीच सहकार्य करणेचे असून शिवाजी विद्यापीठाची विहीत मुदतीत निकाल जाहीर करण्याची परंपरा कायम राखण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

कळावे,

आपला विश्वासू

(महेश काकडे),
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रतः 1.मा.कुलगुरूसो यांचे कार्यालय,
2.मा.प्र.कुलगुरूसो यांचे कार्यालय,
3.मा.अधिष्ठाता,सर्व विद्याशाखा
4.मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र – सर्व कॅप सेंटर यांना कळविणेसाठी

महाराष्ट्र शासन

ई-मेल द्वारे

क्र: विसआ-२०१७/प्र.क्र.५७५/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
ई-मेल: archana.sawardekar@nic.in
दिनांक: ०५/०२/२०१८.

प्रति,

कुलसचिव/कुलगुरु,
सर्व अकृषि पिद्यापीठे.

विषय : विद्यापीठांनी परिक्षांचे निकाल वेळेवर घोषित करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपले लक्ष शासन पत्र क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.५२/विशि-३, दि.१०/१२/२०१५ कडे वेधण्यात येत आहे.

सदर पत्रान्वये परीक्षा पध्दतीत सुधारणा करण्यासंबंधाने राजेश अग्रवाल समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणे व त्याद्वारे राज्यातील अकृषि विद्यापीठातील परीक्षा पध्दती अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्याबद्दल शासन अत्यंत गंभीर असून सर्व अकृषि विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करण्याच्या अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८(४) अन्वये खुलासा घेऊन कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना शासनाने दिलेल्या आहेत. त्याचा पुनरुच्चार करुन सर्व अकृषि विद्यापीठांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ मधील तरतुदीनुसार,

१) सर्व अकृषि विद्यापीठांनी, घेतलेल्या परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत व उशिरात उशिरा ४५ दिवसांच्या आत घोषित करण्यात येतील यानुषंगाने कार्यवाही करावी.
२) सर्व विद्यापीठांनी सर्व विभागवार परीक्षांचे निकाल विहित मुदतीत कशाप्रकारे लावता येतील याबाबत क्रमबध्द सुधारणा घडवून आणाव्यात.
३) परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामी जे अध्यापक टाळाटाळ करतील किंवा जी महाविद्यालये त्यांच्याकडील अध्यापकांना उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामासाठी महाविद्यालयातून मुक्त करणार नाहीत अशा अध्यापक/महाविद्यालयांच्या विरोधात विद्यापीठांनी कारवाई करावी.
४) परीक्षांचे निकाल उशिरा घोषित होण्यामागील कारणे शोधून त्यावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उपाययोजना कराव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात कसुर करणाऱ्या विद्यापीठाकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ८ (७) अन्वये खुलासा घेऊल पुढील कार्यवाही करण्यात येईल, ह्याची नोंद घेण्यात यावी.

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 9/2/2018
Inward No 88
To whom D.B.E.E

आपला,

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

Dy.R-ON-1/2

C:\Users\SUJATA~1.GAW\AppData\Local\Temp\cr५२-२.docx

SHIVAJI UNIVERSITY
Director, Board of Examinations
and Evaluation
Date 14 FEB 2018
Inward No. 28
To Whom :- Dy.R.CON)IQ2